ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# तृतीयपंथी यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग,
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.

**प्रस्तावना**

तृतीयपंथी अर्थात ज्यांना समाज हिजडा, किन्नर वा छक्का म्हणून ओळखतो. त्यांच्याबद्दल नेहमीच समाजातील इतर स्तरांच्या मनात एक नावडती भावना राहिलेली आहे.''हिजडा'' या शब्दाचा अर्थ होतो वेगळी वाट निवडणारी व्यक्ती. समाजातून ज्यांनी आयुष्यात चालण्यासाठी आपली स्वतंत्र वाट निवडली आहे. त्याला ''हिजडा'' म्हणतात.

तृतीय वर्गाला जाणून वाळीत टाकल्यासारखे लोक वागवतात. शरीरातील बदलांमुळे पुरूष असून देखील त्यांना स्त्री सारखं जगावं लागत. अर्थात तृतीयपंथी बनण्यासाठी त्यांच्यावर कोणी जबरदस्ती करत नाही, परंतु समाजातील इतर वर्ग जवळ करत नसल्याने त्यांना निकृष्ट जीवन जवळ करणे भाग पडते. काही तृतीयपंथी उच्च शिक्षीत असून देखील केवळ त्यांच्या 'अश्या' असण्यामुळे त्यांना कामावर ठेवले जात नाही. परिणामी लोकांपुढे हात पसरवून भीक मागण्याची पाळी त्यांच्यावर येते. आपल्या आसपास नेहमीच आपल्याला या वर्गाचे दर्शन होत असते. उगाच म्हणून ते कधीही कुणाला त्रास देत नाहीत. (काही अपवादात्मक अनुभव सोडले तर.... कारण प्रत्येक वर्गामध्ये एक असा घटक असतोच जो संपुर्ण वर्गाचे नाव खराब करतो.) त्यांना पाहिलं की ज्याप्रमाणे एक किळसवाणी भावना उत्पन्न होते. त्याचप्रमाणे त्यांच्या बद्दल कुतुहलदेखील जागे होते. 'तृतीयपंथी वर्गाबद्दल खऱ्या गोष्टी कमी पण जास्त अफवाच लोकांपर्यंत पोहचल्या आहेत. ज्यामुळे या वर्गाची इतर समाजापुढील प्रतिमा अधिकच मलीन झाली आहे.

**विषयाचे स्पष्टीकरण :**

तृतीयपंथीयांचे वर्णन प्राचीन ग्रंथामध्येही आढळते. भारतामध्ये ''शिखंडी'' या पात्राचा उल्लेख आढळतो. हा शिखंडी देखील तृतीयपंथी संबोधला गेला आहे. याच शिखंडीच्या साहाय्याने अर्जुनाने भीष्माचा पराभव केला. पुराणकाळात राजा महाराजांकडे नाच–गाणे सादर करून तृतीयपंथी आपला उदरनिर्वाह करायचे. अर्जुनाला देखील अज्ञातवासात असतांना एका शापामुळे एक वर्ष बृहन्नडाच्या रूपात तृतीयपंथी बनून वावरावे लागले होते. याच रूपात त्याने राजकन्या उत्तरा हिला नृत्य आणि गायन शिकविले होते. असं म्हटलं जातं की, एखादया शुभप्रसंगी दारी आलेल्या तृतीय पंथ्याला जर रिकाम्या हाताने परत पाठवले तर त्या प्रसंगातील शुभशकुन त्यांच्या सोबत निघून जातो. त्यांना कायदयाने लग्न करण्याची वा शाळेत जाण्याची परवानगी नसली तरी, सरकारी कागदपत्रांमध्ये त्यांना स्थान देण्यात आले आहे. तेथे त्यांचा उल्लेख जेंडर – ई म्हणून केला जातो.

तृतीयपंथी वर्गाच्या संस्कृतीची पाळेमुळे हिंदू धर्मात आढळत असली तरी मात्र या वर्गावर इस्लाम धर्माचा प्रभाव जास्त आहे. या वर्गाचे बहुतांश गुरू आणि नेते हे मुस्लिम आहेत. इस्लाममध्ये देखील 'हराम' या नावाने तृतीय पंथीयांचा उल्लेख पाहायला मिळतो. हे हराम सुलतानाच्या दारी (पदरी) चाकरी करायचे. राजा महाराजां प्रमाणे या हरामांना सुलतान नाच गाण्यांसाठी न ठेवता आपल्या बेगमच्या कक्षाभोवती अंगरक्षक म्हणून रूजू करायचे. अनेक हरामांनी आपल्या शौर्याच्या जोरावर मुघल सैन्यामध्ये देखील पदे भुषविली होती. उदाहरण पाहायचे झाल्यास, मलिक काफुर यांच्याकडे पाहिले जाऊ शकते. हा तो हराम होता. ज्याने दिल्लीच्या सुलतान अल्लाउद्दीन खिलजी यांच्यासाठी संपुर्ण दख्खन स्वतः ताब्यात घेतले होते. एखादया पुरूषाच्या अंगी स्त्रीगुण असतील आणि त्याला तृतीयपंथी म्हणून वावरायचे असेल तर त्यापूर्वी त्यांच्या शरीरातून पौरूशत्व काढून घेण्याची प्रक्रिया अतिशय महत्वाची मानली जाते. ही प्रक्रिया म्हणजे त्याचा 'हिजडा' म्हणून पुनर्जन्म आहे असे मानण्यात येते.

**तृतीय पंथीयांचा अंतीम विधी :–** तृतीयपंथीयांचा अंतीम विधी आजही एक रहस्यमय गोष्ट आहे. याबद्दल अनेक अफवादेखील समाजात प्रचलीत आहेत. त्यांचा अंत्यविधी रात्रीच्या समयी पार पडतो आणि त्यात बाहेरच्या व्यक्तीला परवानगी नसते. ही गोष्ट मात्र खरी आहे.

**तृतीय पंथी यांचा वार्षिक उत्सव :–** तृतीय पंथी यांचा वार्षिक उत्सव तमिळ काल गणनेच्या नववर्षी कुवागम या मद्रास मधील लहान गावामध्ये आयोजीत केला जातो. जेथे भारत भरातील सर्व हिजडे एकत्र जमतात.

**तृतीय पंथीयांचे विवाह** :— तृतीय पंथी आपली आराध्य देवता अरावन याच्याची वर्षातुन एकदा लग्न करतात. पण हे लग्न केवळ एका दिवसांच असतं. दुसऱ्या दिवशी अरावन देवाच्या मृत्युसकट त्यांचे वैवाहीक आयुष्य देखील संपुष्टात येते. हिजडा म्हणून ज्यांना हिणवलं जायचं त्यांनाही आम्ही बरोबरीचं स्थान देतोय. हे दाखवण्यासाठी कागदोपत्री नोंदी झाल्यात. अनेक ठिकाणी फॉर्ममध्ये स्त्री—पुरूष आणि तृतीयपंथी यांचे रकानेही आले आहेत. तृतीय पंथीयांना आपलंस करण्यासाठी राजकीय पक्षही आता मागे राहिले नाही. देशातल्या राजकारणा मध्ये तृतीय पंथीयांच्या व्होटबॅकेला आपलंसं करायचं असले. तर त्यांचेही प्रश्न समजून घ्यायला हवेत, याच अचुक 'टाईमिंग' अनेकांनी पकडलं आहे. मात्र तरीही तृतीय पंथीयांनी आपल्या सोसायटी मध्ये, शेजारी राहू देण्यास अदयापही समाज मान्यता मिळालेली नाही. शिक्षणाने आत्मभान आलेले आणि समाजकारण, राजकारण, कलेच्या क्षेत्रात भरीव काम करणारे तृतीयपंथी आपल्या अवहेलना व इतर प्रश्नांसाठी संघर्ष करत आहेत.

मुंबईतीलच नव्हे तर इतर राज्याच्या कानाकोपऱ्यात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कलेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक तृतीय पंथीयांना स्वतःचं किंवा भाडयाचं घर घेताना आलेला अनुभव कटू आहे. स्वतःची जागा नसेल. तर डोक्यावर छप्पर मिळवताना होणारी घुसमट असहय असल्याचा अनुभव तृतीयपंथी उद्वेगाने सांगतात. आमच्याशी बोलायला, आम्हाला स्पर्श करायला घाबरणारा समाज आम्हाला सहेतुक टोमणे मारण्याची एकही संधी समाज सोडत नाही, पूर्वी असलेली गडद भीती आता राहिलेली नसली, तरीही 'ते नकोत' हा सूर आहेच, असे हे तृतीयपंथी सांगतात.

**हे काही अनुभव** :— पुण्यातल्या सुशिक्षित कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या व वाढलेल्या, कुटुंबाने स्वीकारलेल्या सोनाली दळवी एक कटू अनुभव सांगतात. त्या पुण्यात कुटूंबासोबत राहतात. फायनान्समध्ये ची पदवी घेतलेल्या सोनाली यांचे घर दुरूस्तीसाठी काढल्याने त्यांना काही दिवसासाठी भाडयाने राहायला घर हवं होतं. मात्र त्यासाठी अनेक ठिकाणी वणवण करावी लागली. घरमालकाने भाडयाने घर राहायला दिले. तर त्यावरही शेजारी पाजारी कुरबुर सुरू झाली. 'हे इथे नकोच...चे कर्कश सूर उमटू लागले. घरमालक खमका होता. त्याने सोनाली कुटुंबासोबत राहते, असे ठणकावून सांगितले. ती वेळ निभावली गेली, पण त्यासाठी झालेला मनस्ताप आणि मिळालेली वागणूक ही आजही सोनालीला व्यथित करते.

**तृतीय पंथीयांवर तक्रार** :— ममता पाटील, शोभा पी. आशा. गुड्डी नायर या तृतीय पंथीयांनी गावाबाहेरची वस्ती सोडून मुख्य शहरात राहायचा निर्णय घेतला. जागेसाठी वणवण करावी लागली. अखेर ती मिळाली, तर सात—आठ दिवसांतच पोलिस स्टेशनला तक्रारी करण्यात आल्या,'या इथे नको,ते धंदे करतात, त्यांच्या इतर गॅग ला इथे घेऊन येतात. त्यांना इथून हाकला.' ममता सांगते, 'आम्ही तिघीही सामाजिक संस्थेमध्ये, खाजगी कंपनीमध्ये काम करतो. समाजातल्या अन्य कुणा प्रमाणे ही दांडगा सामाजिक संपर्क आमचाही आहे, त्यामुळे माणसांची उठबस ही जशी इतरांच्या घरात असते, तशी आमच्याही घरामध्ये असायची, त्यात आम्ही नको ते धंदे करणारे कसे झालो ?'हा सवाल सुन्न करतो.' तक्रारी वाढल्या की. पोलिसांची गस्त व्हायची, त्यांनाही समजावून सांगायला लागायचं. कधीतरी ते पोलिस स्टेशनला न्यायचे, चौकशी व्हायची. या सगळयातून नैराश्य यायचं, गुड्डी सांगतात. तरीही या तिघींनी हार मानली नाही.

**जास्त घरभाडयाचा त्रास** :— गुरू शिष्य परंपरेमध्ये राहणारे, शहरातील तसेच ग्रामीण भागातील अनेक किन्नर शिकून सवरून स्वतःची वेगळी वाट शोधण्याचा प्रयत्न करतात. वस्त्यांमध्ये, गल्लीच्या कोपऱ्यात, गाव कुसाबाहेरचं आयुष्य त्यांना आता नकोय. स्वतःचं हक्कांच घर असांव, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. दलालांच्या माध्यमातून भाडयाने घर मिळतं, पण त्यासाठी जास्त पैसे मोजावे लागतात. इतरांकडून भाडयाने घर घेण्यासाठी जे पैसे घेतले जातात. त्याच्या दाम दुप्पट रक्कम आमच्याकडून घेतली जाते. गरज असल्याने हे पैसे देण्याखेरीज दुसरा पर्याय नसतो. हे सुध्दा कोल्हापूरच्या मैत्री फाऊंडेशनच्या संचालक मयुरी आवळेकर सांगतात. जिथं एकटया महिलेला हा समाज जगू देत नाही. तिथं तृतीय पंथीयांची काय गत... आजही समाजाला तृतीयपंथी हिंसक वाटतात, यांना कामधंदा नाही, तर हे पैसे कुठून देणार, आपल्यात राहायला आले तर चोऱ्यामाऱ्या करणार, मुलं बिघडणार या विचाराने समाजात स्थान मिळत नसल्याचं दुःख त्यांच्याही बोलण्यातून व्यक्त होतं. कर्नाटकच्या सीमेजवळील गावामध्ये तृतीयपंथीयांना देवाची लेकरं म्हणून मान दिला जातो. त्यामुळे शहरांसारखा दाहक अनुभव येत नसला, तरीही समानतेची वागणूक मिळत नसल्याने आजही गाव कुसा बाहेर राहावं लागतं.

'स्पेस' कशी मिळणार ? आज ही अनेक किन्नर आखाडयात वा गुरू—शिष्य परंपरेमध्ये राहतात. परंपरेमध्ये राहण्याची एक शिस्त आहे. तिथला दिनक्रम, आखाडयांचे नियम पाळावे लागतात. श्री रामपूरला राहणाऱ्या प्राची पिंकी शेख या गुरूचं ऋण मान्य करून सांगतात की, 'स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी गुरूने कायम पाठिंबा दिला, त्यामुळे कलेच्या

क्षेत्रात उमेदीनं काम करू शकतात. मात्र कलावंत म्हणून काम करण्यासाठी, विचार करण्यासाठी प्रत्येकाला स्पेस हवी असते. त्यासाठी छोटं का होईना हक्काचं घर हवं. रात्री चित्र काढणं, रेखाटन करण्यासाठी स्वतःची जागा लागते. ती गर्दीत कशी शोधणार? बौध्दिक–मानसिक स्तरावर सुरू असलेली आमच्यातील अनेक कलावंतांची ही घुसमट आजही आम्हाला सांगता येत नाही.' स्वच्या शोधात निघालेल्या तृती सपंथी यांमधील कलाकर्मी स्वतःच्या 'स्पेस' साठी अहोरात्र धडपडत राहतात.

**गृहयोजनांमध्ये हवे आरक्षण** :– विविध क्षेत्रातील मान्य वरांसह उपेक्षित घटकांना घरकुल, गृहनिर्माण योजनांमध्ये तृतीय पंथीयांसाठी घराचं आरक्षण ठेवण्यात आलेलं नाही. वसईतील नायगाव मध्ये भाड्याने घर घेण्यासाठी केलेला आटापिटा प्रिया पाटील नेमकेपणाने सांगतात. प्रकृतीच्या कारणासाठी त्यांनी कुर्ला मधील घर सोडून नायगावला जाण्याचा निर्णय घेतला. भाडयाने घर घेतानाही टोमणे, कुजकट बोलणी, धमक्या सहन कराव्या लागल्या. प्रिया थेट प्रश्न विचारतात, की राजकारण, समाज कारणामध्ये सक्रिय असलेल्या व्यक्तीला केवळ तृतीयपंथी म्हणून घर मिळत नसेल तर, इतरांची काय गत? तृतीय पंथी कुठे राहतात, काय करतात. त्यांच रोजचं आयुष्य कसं असतं, अशा अनेक गोष्टींशी सर्व सामान्यांना काही देणंघेणं नसंत. त्याबद्दल समजून घेण्याची तसदीही घेतली जात नाही. त्यामुळे गैरसमज दूर होत नाहीत.

**आश्रमांचे प्रस्ताव कागदा वरच** :– सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नालसा निर्णया नंतरही राज्यामध्ये अद्याप तृतीय पंथी यासाठी वेगवेगळया महामंडळांची स्थापना करण्यात आलेली नाही. आघाडी सरकारच्या काळामध्ये मुलुंड येथे तृतीय पंथीयांच्या आश्रमासाठी जागा देण्याचे मान्य करण्यात आले होते. त्यासाठी राज्यातील तृतीय पंथीयांचे सर्वेक्षणही करण्यात आले होते, मात्र सरकारी निर्णयात अशी तरतूद नसल्याचे सांगून हा प्रस्ताव फेटाळला.

**संपत्ती मालमत्तेवर अधिकार नाही** :– तृतीय पंथी यांच्या वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात अनेक पेचप्रसंग, कायदे विषयक अडचणी उभ्या राहतात. प्रशासकीय समित्यांमध्ये नाम निर्देशित उमेदवार म्हणून सहभाग असो किंवा कॉलेजां मधील प्रवेश अशा विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी महामंडाळांचा आधार महत्त्वाचा ठरू शकतो. मात्र तृतीय पंथीयांच्या समस्या नेमक्या कोणत्या विभागाने सोडविणे? हा प्रश्न अदयाप सरकार–दरबारी सुटलेला नसल्याने या महामंडळाची निर्मितीच खोळंबली आहे. त्यासाठी दरवर्षी पाच कोटी रूपयांचा निधी संमत केला जातो, तो देखील विनावापर परत जातो. कुटुंबा मधून अनेकाना बेदखल केलं जातं. कागद पत्रांशिवाय घराबाहेर हाकलून दिलं जातं. त्यामुळे संपत्ती, मालमत्ता यातील अधिकारही आजही नाकारलेला आहे.

**उतारवयामध्ये परिस्थिती बिकट** :– ज्यांच्या हाताला काम नसते, ते तरूण वयात भीक मागून, चाकरी करून पोट भरतात पण शिक्षण, नोकरी, कामधंदा नसलेल्या अनेकांची उतारवयातील परिस्थिती अतिशय बिकट असते. दोन वेळ खाण्याचेही भ्रांत असते. स्त्रीपुरूषांसाठी ज्या प्रकारे वृध्दाश्रम उभारले जातात त्याप्रमाणे तृतीयपंथीयांसाठीही ते असायला नकोत का? असा प्रश्न पहिल्या तृतीयपंथी बीमा एजेंट असलेल्या माधुरी सरोदे–शर्मा करतात.

**महामंडळाची प्रतीक्षा** :– या समाजघटकाच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण करून त्यांना विकासाची समान संधी देण्यासाठी तृतीयपंथी कल्याण मंडळाची निर्मिती करण्याचा निर्णय सरकारने 28 ऑगस्ट 2014 रोजी घेतला. या मंडळा मध्ये महिला व बालविकास विभागाच्या मंत्री, प्रधान सचिव, विधानसभा सदस्यांसह तृतीय पंथी समुदायातील एका व्यक्तीचा समावेश असणे बंधनकारक होते. विधी, वैदयकीय आणि सामाजिक कार्यक्षेत्रातील प्रत्येकी एक व्यक्ती तृतीयपंथीयांसाठी काम करणाऱ्या नामवंत संस्थांमधील दोन व्यक्तीचाही या मंडळात समावेश केला जाणे अपेक्षित होते. केरळ, तामिळनाडू, छत्तीसगढ या राज्यामध्ये ही मंडळे स्थापित झाली आहेत. मात्र महाराष्ट्रात त्याची सुरूवात अद्याप झालेली नाही. तृतीय पंथीयांचे सामाजिक, न्यायविषयक, वैद्यकीय प्रश्न लक्षात घेता या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांमधील दोन तृतीयपंथी व्यक्तींचाही या मंडळामध्ये समावेश असावा, असे स्पष्ट करण्यात आले होते. सरकारच्या विविध योजनाचे लाभ या समुहाला मिळवून देणे, लाभार्थीची नोंदणी, त्यांना ओळखपत्र मिळवून देणे, तृतीय पंथीयाच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी कला अकादमी स्थापन करणे, आदी बाबी महामंडळाची स्थापना न झाल्याने आजही तसेच राहिले आहेत.

**मी आहे तरी कोण** :– तृतीय पंथी यांच्या मूलभूत अधिकारांच्या पायमल्ली बरोबरच त्यांना अनेक समस्या भेड सावतात. सरकारच्या सर्व योजना स्त्री पुरूषांसाठी आहेत. मात्र तेथे तृतीय पंथी कोठेच बसत नाहीत. महाराष्ट्र सरकारने तृतीय पंथीयांच्या मेळाव्यात कल्याणकारी बोर्ड स्थापन करून त्यांच्या पुनर्वसनासाठी योजना राबविण्याचे जाहीर केले, पण त्या संबंधी कोठेच उल्लेख नाही. त्यामुळे मी ना पुरुष, ना बाई! मी आहे तरी कोण? असे म्हणण्याची वेळ तृतीय पंथी यावंर आली आहे. त्यासाठी समाज व सरकारच्या पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र सरकारने तृतीय पंथीयांच्या मेळाव्यात त्यांच्यासाठी कल्याणकारी बोर्ड स्थापन करण्यात येत असून, त्यांच्या मार्फत तृतीय पंथीयांच्या पुनर्वसनासाठी व त्यांच्या मानवी हक्काच्या जपणुकीसाठी विविध योजना राबविल्या जातील, असे जाहिर केले. राज्य व जिल्हा पातळीवर वेगळे कल्याणकारी बोर्ड असेल अशी केवळ सरकारने घोषणा केली, पण पुनर्वसनाच्या काय योजना असतील, यासंबंधी कोठेच उल्लेख नाही. निवडणूक ओळख पत्रामध्ये 'लिंग' शब्दा समोर स्त्री/पुरूष/इतर असा उल्लेख केला आहे. किमान महाराष्ट्र सरकारला त्यांच्या प्रश्नांची जाण असून, ते संवेदनक्षम आहेत. एवढा तरी संदेश यातून मिळतो.

तृतीय पंथीय कोण : – प्रत्यक्षात ज्या व्यक्तीचे शरीर पुरूषाचे, मात्र मानसिकता, हावभाव, वर्तवणूक, बोलणे–चालणे पूर्णपणे स्त्रीचे आहे, अशा व्यक्तीला तृतीय पंथीय म्हणतात. सर्व साधारणपणे जन्मतःच ज्यांच्या लिंगात विकृती निर्माण झालेली असते किंवा ज्यांच्या शरीरात संप्रेरकाचे (हार्मोन्स) असंतुलन निर्माण झालेले असते किंवा ज्याची वाढच पूर्णपणे मुली व स्त्रियांच्या प्रभावाखाली आल्याने वर्तणूक स्त्रियांसारखी होते किंवा जे विविध कारणांसाठी लिंग विच्छेदनाचा मार्ग स्वीकारतात. अशा सर्व व्यक्तींचा तृतीय पंथीयांमध्ये समावेश होतो. तृतीय पंथीयांना हिजडा, पवय्ये, खोजे, बंदे, देवडा, फालक्या, फातडा, मंगलमुखी, आदी संबोधनांनी ओळखले जाते.

**तृतीय पंथीयांच्या समस्या** :– रेल्वे, बसस्टॅड अशा सार्वजनिक ठिकाणी स्त्री व पुरूषांसाठी वेगवेगळया रांगा असतात. त्यामुळे तृतीय पंथीयांनी कोणत्या रांगेत उभे राहावे, असा त्यांच्या समोर प्रश्न पडतो. शिक्षण व कौशल्याचा अभाव, बेरोजगारी, गरिबी व समाजाकडून होणारा भेदभाव यामुळे ते गुन्हेगारीकडे तरी वळतात किंवा काम धंदा करून उपजिविका करताना समाजातील इतरांकडून त्यांचे लैंगिक व आर्थिक शोषण केले जाते. जातीचा दाखला, जन्म दाखला, वास्तव्याचा पुरावा नसल्याने तृतीय पंथीयांना शाळा प्रवेशात अडचणी येतात. त्यामुळे त्यांना शिक्षण पूर्ण करता येत नाही.

**पुनर्वसनासाठी काय करावे ?** :– समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकल्या गेलेल्या वंचित, शोषित अशा तृतीय पंथीयांना कायदेशीर मान्यता देऊन त्यांना आरोग्य, शिक्षण, रोजगार, मतदान, निवडणूक लढविण्याचा हक्क, वारसा हक्क, आदी मूलभूत मानवी हक्क, उपभोगण्याचा पूर्ण अधिकार आहे. सध्या तृतीय पंथी शरीर विक्रय. भीक मागणे, धार्मिक कार्यक्रम, जन्म व विवाह प्रसंगी घरोघरी जाऊन आशीवार्द देणे व गुन्हेगारी यातून आपला चरितार्थ चालवतात. आंतराष्ट्रीय संकेत व कायदयानूसार लैंगिक ओरिएंटेशन व लिंग ओळख काही असली तरी सर्वजण समान आहेत व सर्वांना समान मानवी हक्क मिळाले पाहिजेत. या विचारधारणेला अनुसरून तृतीय पंथीयांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देणे हे सरकारचे कर्तव्यच आहे.

**सार्वजनिक आरोग्य** :– डॉक्टर व हॉस्पिटल मधील कर्मचारी यांचा तृतीय पंथीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी त्यांना संवेदनक्षम करणे. एच आय व्ही/एड्ससंबंधी प्रशिक्षण, डॉक्टर, कर्मचारी, तृतीयपंथी यांना नियमितपणे सेवा देणे, लिंगबदल, दवाखान्यात मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य खात्याने सर्व आरोग्य संस्थांना मार्गदर्शक तत्वे बनवून देणे व तृतीय पंथीयांना उपचार व शस्त्रक्रिया यासाठी आरोग्य बीमा योजना अमलात आणणे आवश्यक आहे.

**शिक्षण** :– तृतीय पंथीयांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांच्या प्रवेशासाठी लागणारी कागद पत्रे, वास्तव्याचा पुरावा हे नियम शिथिल करणे, शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती व कर्मचारी यांना त्यांच्या समस्या बाबत संवेदनक्षम बनवणे, प्रौढ तृतीय पंथी यांसाठी साक्षरता अभियान, उच्च शिक्षणासाठी शून्य व्याजदराने कर्ज देणे, शालेय शिष्यवृत्तीत व बालगृहामध्ये त्यांच्यासाठी जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे. शिक्षणा–बरोबरच अंधश्रध्दा निर्मूलन व विविध घटनां मधील असणारे शास्त्रीय कारण साध्या, सोप्या भाषेत व जादूटोणा कायद्याविषयीची साक्षरता आवश्यक आहे.

**सामाजिक सुरक्षितता** :– राज्यातील सर्व तृतीय पंथीयांचे सर्वेक्षण करून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, भावनिक व लैंगिक जीवनाच्या शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करून सरकारने त्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांच्या कल्याण कारी योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्य स्तरावर एक समिती नेमून त्यामध्ये त्यांच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या व्यक्ती, स्वयंसेवी संस्था यांचा समावेश करावा. तृतीय पंथीयांना फोटो व पत्यासह कायम स्वरूपी ओळखपत्र देण्यात यावे.

**प्रतिबंधात्मक उपाय** :– कोणत्याही व्यक्तीला तृतीय पंथी आयुष्य जगण्याची सक्ती होऊ नये, यासाठी अंधश्रध्दा निर्मूलन व प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गरोदर महिलेस प्रसूतीपूर्व सर्व वैद्याकीय मदत मिळणे गरजेचे आहे. व्यक्तिमत्त्व दोषा संदर्भात सुयोग्य समुप देशन, मार्गदर्शन व प्रत्यक्ष मदत वेळीच कशी मिळेल. यासाठी समुप देशन केंद्राची स्थापना, तसेच हार्मोन्स असंतुलनामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नावर योग्य वैद्याकीय उपचार व मार्गदर्शन मिळण्यासाठी आरोग्य केंद्रे स्थापणे आवश्यक आहे.

लहान पणा पासूनच तृतीय पंथीयांना अनेक समस्यांना सामोरं जावं लागतं. या व्यक्तींना वयाच्या दहाव्या – बाराव्या वर्षी आपल्यातील वेगळेपणाची चाहूल लागते, पण त्याच वेळी आणि बरेचदा त्या आधीच त्यांना स्त्री किंवा पुरूष यापैकी कोणत्या तरी एका लिंग समुहामध्ये जबरदस्तीने बसवण्याचा प्रयत्न केला जात असतो. यापैकी कोणत्याही गटात सहज वावरू न शकणारं ते मूल आपोआपच तिरस्काराचा विषय ठरू लागतं. अनेक कुटूंबाना अशी मुलं नकोशी असतात. मग ते त्यांना घराबाहेर काढतात किंवा स्वतःहून घर सोडून जाण्यास उद्युक्त करतात. अतिशय संवेदनशील मुलं आपल्यामुळे कुटुंबाला त्रास होऊ नये म्हणून स्वतः घर सोडून पळूनही जातात. अशा परिस्थितीत अनेकांचं शिक्षण अर्धवटच राहतं. घरातून बाहेर पडलेली ही मुलं दुसऱ्या शहरात जाऊन राहता, जिथे त्यांना कोणीच ओळखत नाही. त्यांच्याकडे कुठलंच ओळखपत्र किंवा पुरावा नसल्याने आसऱ्यासाठी आणि अन्नासाठी दारोदार भटकत फिरतात. मग किन्नर समाजाकडूनच त्यांना मदत केली जाते. तृतीय पंथी यांच्या गुरू–चेला परंपरेनुसार ते राहू लागतात.

किन्नर समाजाबद्दल लोकांना भीती, घृणा आणि अनुकंपा अशा तीन भावना असतात, पण त्यांच्याबद्दल कुणालाच आपुलकी वाटत नाही. समाजात मानाचं स्थान नाही आणि शिक्षणाचा अभाव, यामुळे त्यांना कोणीही नोकरी देत नाही. साध घरकाम किंवा आयाचं कामही त्यांना मिळत नाही. अशा वेळी हे लोक कुणाकडे जाणार? शेवटी हे लोक भीक मागतात किंवा देह विक्रयाचं काम करतात. आपल्या पौराणिक कथां मध्ये नर, नारी आणि किन्नर असे तीन उल्लेख स्पष्ट पणे आढळतात. किन्नर हे देवाचे भक्त असल्यामुळे त्यांना समाजात आदराचं स्थान असल्याचं मानलं जातं. ब्राम्हणां प्रमाणेच किन्नरांनाही दान देण्याची प्रथा होती. पण आता मात्र त्यांची समाजात अवहेलना होते आहे. शरीराने धडधाकट असताना, कोणतंही काम करून जगण्याची त्यांच्यात क्षमता असताना त्यांना समाजाच्या भीकेवर किंवा शरीरविक्रय करून जगावं लागतं आहे.

तृतीय पंथीयांनी समाजात आपली ओळख लपवून राहण्याचं मुख्य कारण म्हणजे कुणालाही आपल्या शेजारी तृतीय पंथी नको असतात. कारण ते देह विक्रयाचं काम करतात. अशी लोकांची समजूत असते. हे लोक आपल्या मुलांना बिघडवतील, त्यांना पळवून नेतील, वाम मार्गाला लावतील असे अनेक गैरसमज या समाजा बद्दल लोकांमध्ये आहेत. किन्नर समाजातील लोक झोपड पट्टीत राहतात. तिथे त्यांच्या राहण्याचा आणि जेवणाच्या दर्जा काय असणार? झोपड पट्टीत राहत असल्याने कुठल्याच सुरक्षिततेची खात्री नसते. वास्तव्याचा किंवा जीवनाचा कुठलाच पुरावा नसल्याने बँकेत खांत उघडता येत नाही. दररोज लोकांपुढे हात पसरा आणि खा. अशी परिस्थिती असल्याने पैसे साठत नाहीत. पैसे स्वतः कडेच जमवून ठेवावे लागतात. त्यातून भांडण होतात. चोरी देखील होते. याची सरकारी दतरी नोंद केली जात नाही. त्या उलट त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं जातं. त्यांच्या विरोधात घडणाऱ्या गुन्हयांची नोंदही केली जात नाही.

ग्रामीण भागात कमावत्या लोकांचे हाल कुणीही विचारत नाही, तर तृतीय पंथीयांना कोण विचारणार अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शहराकडे धाव घेतली जाते. शहरात राहण्याचा खर्च परवडत नाही. महिन्याला झोपडीच्याच भाडयाला पाच–सात हजार दयावे लागतात. वर लाइट बिल, पाणीपट्टी, प्रवास, खाणं हा खर्च भीक मागून भागत नाही. मग अनेक जण देह विक्रीतून पैसा कमावतात, पण तिथेही स्पर्धा आहे. ग्राहकांची पहिली पसंती देहविक्री करणाऱ्या स्त्रियांनाच असते. मग जे गिऱ्हाईक मिळेल त्याच्या कडून मिळेल तितकं घ्यावं लागतं. त्यातही शारिरीक आणि मानसिक अत्याचारांना सामोरं जावं लागतं.

सामान्य स्त्री पुरूषांप्रमाणे तृतीय पंथीयांच्या शरीराच्याही काही वेगळया गरजा असतात. त्यांच्या शरीराची ठेवणही वेगळी असते. या बाबत अनेकदा डॉक्टरांनाही पुरेशी माहिती नसते. त्यामुळे तृतीयपंथी यांच्या शारीरिक जखमावर उपचार करायला डॉक्टर तयार होत नाहीत. अनेक डॉक्टर मंडळी तर तृतीयपंथी यांना हात लावायला देखील घाबरतात. अशावेळी एकातून दुसऱ्या रोगाचा प्रादुर्भाव होतो आणि त्याचा खर्च आवाक्याबाहेर जातो. समाजात आदराचं स्थान नसल्याने तृतीय पंथी भौतीक सुखातच धन्यता मानतात. देहविक्रीसाठी शरीर सुंदर बनवताना शरीरावर अनेक शस्त्रक्रिया करून घ्याव्या लागतात. चेहऱ्यावरील केस काढण्याच्या साध्या लेझर ट्रीटमेंटसाठीही एका सिटींगला तीन ते चार हजार खर्ची होतात. त्या शिवाय हार्मोन्सच्या बदलासाठी खूप मोठी रक्कम खर्च करावी लागते. हा सर्व पैसा कुठून उभा करायचा, असा प्रश्न अनेकांसमोर असतो.

समाजा कडून तुच्छतेची भावना व वागणूक मिळत असल्याने तृतीय पंथीयांमध्ये जीवनेच्छा फार कमी असते. त्यांच्याकडून काहीवेळा आत्महत्येचे प्रयत्न होतात; पण बरेचदा इतरांसाठी त्यांना जगावं लागतं.अनेक तृतीय पंथी आपल्या गुरूची त्याच्या उतारवयात काळजी घेतात. शिवाय ज्या कुटुंबाने त्यांना नाकारलं त्यांनाही आर्थिक मदत पाठवत असतात. बहीण–भावाचं शिक्षण, लग्न यामध्ये त्यांचा मोठा हातभार असतो. तृतीय पंथीयांची ही

चांगली बाजू समाजासमोर कधीच येत नाही. याचं अनेकांना दुःख वाटतं. बँकेत खातं नाही, नोकरी नाही, त्यामुळे आपल्या आर्थिक गरजांसाठी खासगी संस्था किंवा व्यक्तीं कडून चढया व्याजानं कर्ज घेतलं जातं. ते भरता न आल्यास चक्रवाढ व्याज. मग ते फेडण्यासाठी अधिक पैसे कमवावे लागतात अशा वेळी जीवास न झेपणारी कामही करावी लागतात. देह विक्रीच्या वेळी होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक अत्याचारा पासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी नशेचा आधार घेतला जातो. त्यासाठी पैसे मोजावे लागतातच पण त्यातून नंतर निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपचार करण्यासाठीही पैसा खर्च होतो. हा पैसा आणायचा कुठून, हा या समाजासमोरील मोठा प्रश्न आहे.

तृतीयपंथीयांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्यासाठी काम करणाऱ्या संस्थाना दोन पातळयांवर काम करावे लागते. एक तर या समाजाला कामासाठी तयार करणं आणि दुसरं ते जिथे काम करणार आहेत. त्यांची त्यांच्या विषयीची मानसिकता बदलणं. हजारो वर्षापासून असलेली ही मानसिकता बदलायला वेळ लागेल. पण दोन्ही बाजूंनी संयम बाळगणं आवश्यक आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याचा प्रयत्न करणाऱ्या तृतीयपंथीयांना पुन्हा एक पाऊल मागे टाकावं लागलं. अशीही उदाहरणं आहेत. मानवी बंदोपाध्याय या तृतीयपंथी समुदायातील पहिलया सहयोगी प्राध्यापक म्हणून पश्चिम बंगालमधील विवेकानंद सातोबर्कशी महाविदयालयात रूजू झाल्या होत्या. परंतु सहा महिन्यातच त्यांना तिथून काढता पाय घ्यावा लागला. कोची मेट्रोमध्येही तब्बल 18 तृतीयपंथींयांना नोकरी दिली गेली होती. पण अर्ध्याहून अधिक लोकांना ती सोडावी लागली. मधूकिन्नर या छत्तीसगढ़ मधील रायगड जिल्हयाच्या पहिल्या तृतीयपंथी महापौर परंतु त्यांच्या सुरूवातीच्या वर्षभराच्या कार्य काळात त्यांच कुणीच ऐकलं नाही. एकुणच संधी मिळत असली तरी सन्मानपूर्वक वागणुकीचा मोठया प्रमाणात अभाव आहे.

तृतीयपंथी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचा कौशल्यविकास होणं खूप आवश्यक आहे. व्यवसायासाठी बँकांनी कमीत कमी कागद पत्रांच्या आधारावर कमी व्याजाची कर्जे उपलब्ध करून देणंही तितकंच गरजेचं आहे. 'मेक इन इंडिया' सारख्या योजनांच्या खूप गाजा–बाजा केला जातो पण, यामध्ये तृतीयपंथी समाजाच्या कौशल्यविकासाचा उल्लेख आहे का? कौशल्यविकास म्हणजे केवळ सगळयांना मेणबत्त्या बनवायला शिकवणं नाही, तर त्यांच्यातील गुण हेरून त्या पद्धतीने त्यांना प्रशिक्षण देणं आणि समान संधी उपलब्ध करून देणं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे सर्व सार्वजनिक आणि खाजगी नोकऱ्या, शिक्षण आणि राजकारणात आरक्षण असायला हवं. भारतात तृतीय पंथीयांची संख्या तब्बल चाळीस लाखांच्या घरात आहे. त्यांचा समुदायाचा प्रतिनिधी व्यवस्थेत असल्या शिवाय त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळणार नाही. राज्यसभेवर अनेक खेळाडू आणि अभिनेत्रींची वर्णी लागते. आपल्या कार्य काळात ते संसदेत फिरकत सुध्दा नाहीत. तृतीय पंथी समुदायातील अनेकजण राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचं प्रतिनिधित्व करतात. मग त्यांची राज्य सभेवर वर्णी लागायला काय हरकत आहे, असा सवालही या समाजाच्या प्रतिनिधीकडून उपस्थित केला जातो.

2011 च्या जनगणनेत पहिल्यांदा तृतीयपंथीयांची जनगणना झाली पण, त्या व्यतिरिक्त कुठलंही सर्वेक्षण करताना त्यामध्ये तृतीय पंथीयांचा समावेशच नसेल तर त्यांची खरी संख्या आणि त्यांच्या समस्या समाजासमोर येणारच नाहीत. इतर विकसित देशांच्या तुलनेत आपल्याकडे या समाजाला भेद भावाला जास्त प्रमाणात समोर जावं लागतं. पण इतर देशात त्यांच्यासाठीचे कायदे जास्त पूरक आहेत. आपल्याकडे या समाजाला कायदयाच्या संरक्षणाची आवश्यकता आहे. उच्च न्यायालय म्हणतं की, महिला, पुरूष आणि तृतीयपंथी यांना समाजात समान स्थान आहे. मग लोकांना या समाजाची अडचण का वाटावी? त्यामुळे कायदया बरोबर लोकांची मानसिकता बदलणेही अत्यंत गरजेचे आहे.

ट्रान्सजेंडर (विभिन्न लिंगी) सामाजिक कार्य कर्त्या आणि कवयित्री दिशा पिंकी शेख यांची वंचित बहुजन आघाडी प्रदेश प्रवक्ते पदी निवड करण्यात आली आहे. राजकीय पक्षाच्या प्रवक्ते पदी निवड होणारी दिशा ही महाराष्ट्रातील पहिली ट्रान्सजेंडर आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीनं पक्षाच्या प्रवक्त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा शनिवारी करण्यात आली. या निवडी बद्दल बोलताना दिशा म्हणतात, आयुष्यात पहिल्यांदा अधिकृत राजकीय जबाबदारी स्वीकारतांना थोडं दडपण आलंय पण स्वतःबद्दल थोडा स्वाभिमानही वाटतोय. समाजात बदल घडवून आणायचा असेल तर अल्पसंख्यांकांना सत्तेत वाटा देणं गरजेचं आहे. अल्प संख्यांकांचे प्रश्न मांडण्यासाठी त्यांना राजकीय प्रति निधित्व देणं महत्त्वाचं आहे. मला मिळालेल्या या संधीमुळे आमच्या समाजातील अनेक प्रश्नांना मी वाचा फोडू शकते. अधिकृतरित्या राजकीय जबाबदारी स्वीकारण्याच्या या निर्णया पर्यंत पोहोचण्यासाठी मला एक वर्ष लागलं. शिवाय माझ्या समुदायातील मंडळी माझा हा निर्णय स्वीकारतील का?, याबद्दल मी साशंक होते. परंतु, त्यांनी माझ्या निर्णयाचे स्वागतच केले. राजकीय बदलांचे वारे आता खऱ्या अर्थानं वाहू लागले आहेत. असा

विश्वास आता त्यांना ही हळूहळू वाटू लागला आहे.

कोरेगांव भीमाच्या विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी जमलेला लाखोंचा जन समुदाय, परिसरात लागलेली दोन शेंवर पुस्तकांचे स्टॉल, तेथे पुस्तक चाळणारी आणि विकतही घेणारी तरूणाई... असे चित्र पाहायला मिळत होते. या गर्दीत एक व्यक्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. तिच्या हातात 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर' या 12 पुस्तकांच्या खंडांच्या मोठा गठ्ठा होता. स्टॉलवर ती इतर पुस्तक पाहत होती. त्याच वेळी राज्य भरातून आलेली तरूणाई भारावून जात तिच्या जवळ येत होती. तिची आपुलकीने चौकशी करीत होती. तिच्यासोबत हस्तांदोलन करत होती. कोणी तिच्या सोबत सेल्फी, तर कोणी फोटो काढत होते. 'ताई कशी आहेस?' हा सगळयांचा आपुलकीचा प्रश्न. एवढया धावपळीत ती सगळयांना वेळ देत होती. सगळयांशी आपुलकीने संवाद साधत आपुलकीने चौकशी करत होती. ही व्यकती नेमकी कोण? तरूणाई तिच्या मागे–पुढे का फिरत आहे, तिच्याशी काय संवाद साधत आहे हे पाहून कुतुहल वाटले. तिला बोलण्यासाठी पुढे गेलो. हे इतके पुस्तक आपण आता घेतले. आपल्या वाचनाचे विषय कोणते आहेत. तरूणाई आणि आजच्या आंबेडकरी साहित्या बद्दल काय सांगाल, असे प्रश्न विचारत आमचा तिच्याशी संवाद सुरू झाला.ती जळगांव जिल्हयातील तृतीयपंथी शमिभा पाटील होती. ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बाप मानते. त्यांच्यावरचे साहित्य वाचत मी मोठी झाले.

***संदर्भ सूची :***


1) inmarathi.com
2) *महाराष्ट्र टाईम्स, 26 मे 2019,शर्मिला कलगुटकर*
3) *महाराष्ट्र टाईम्स,23 फेब्रुवारी 2014,प्रा. साधना झाडबुके*
4) *लोकसत्ता,22 फेब्रुवारी 2018,प्रशांत ननावरे*
5) *महाराष्ट्र टाईम्स,23 फेब्रुवारी 2019, शाल्मली रेडकर, मुंबई*
6) *दैनिक दिव्य मराठी, 29 जानेवारी 2020*